<u>मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्प</u>
सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. पीड्ब्ल्युसी कंपनीस माहे एप्रिल,२०१७ ते जून,२०१७ या कालावधीकरीता केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीसीटी -३६१६ /प्र.क्र.७६ /भाग-२/पोल-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, २ रा मजला, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १५ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा:</u>

१. माहिती तंत्रज्ञान विभाग व मे.प्राईस वॉटर हाऊस कुपर प्रा.ली. यांच्यादरम्यान झालेला करार दि. १७.११.२००९
२. माहिती व तंत्रज्ञान संचालनालय ,शासन निर्णय क्रमांक : GAD-मातंस ०८०/४/२०१४-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), दिनांक: ०१.०७.२०१४,
३. गृह विभाग ,शासन निर्णय क्रमांक:सीसीटी ३६१५/प्र.क्र.९३/पोल-३, दिनांक: २९.०५.२०१५
४. गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक: सीसीटी ३६१५/प्र.क्र.७६/भाग-१/पोल-३, दिनांक: २५.०७.२०१६
५. गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक: सीसीटी ३६१५/प्र.क्र.७६/भाग-१/पोल-३, दिनांक: २५.०७.२०१७
६. मे.प्राईस वॉटर हाऊस कुपर प्रा.ली. यांची माहे एप्रिल,मे व जून, २०१७ दि. ३०.६.२०१७ ची देयके.

<u>प्रस्तावना</u>

माहिती व तंत्रज्ञान विभागाने दि. १७.११.२००९ रोजीच्या करारान्वये मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी मे. प्राईस वॉटरहाऊस कुपर्स प्रा.ली. या कंपनीची सल्लागार म्हणुन नियुक्ती केली आहे. तद्नंतर गृह विभाग शासन निर्णय दि. २९.५.२०१५ अन्वये सदर कंपनीस दि. ३०.४.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच त्यानंतर गृह विभाग शासन निर्णय दि. २५.०७.२०१६ अन्वये सदर कंपनीला मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागार म्हणुन दि. ३०.४.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सद्यस्थितीत मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्प कार्यान्वित झाला नसल्याने गृह विभाग शासन निर्णय दि.२०.५.२०१५ अन्वये गठित प्रकल्प अंमलबजावणी समितीने दिलेल्या मान्यतेनुसार गृह विभाग शासन निर्णय दि.२५.७.२०१७ अन्वये प्रकल्प सल्लागार मे. पीड्ब्ल्युसी कंपनीला दि. ३०.४.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि. १.७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्यानुसार त्यांना मानधन अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यानुसार सदर कंपनीने उपरोक्त प्रकल्पासंदर्भात प्रकल्प सल्लागार म्हणुन

दिनांक १ एप्रिल २०१७ ते दि. ३० जून २०१७ या तीन महिन्याच्या कालावधीसाठी पाहिलेल्या सल्लागाराच्या कामाची देयके अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>

मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार मे.पीड्ब्ल्युसी कंपनीने दिनांक १ एप्रिल २०१७ ते दि.३० जून २०१७ या तीन महिन्याच्या कालावधीसाठी पाहिलेल्या सल्लागाराच्या कामाचे देयक म्हणुन (मानधन, सेवा कर व इतर खर्च मिळून) एकूण रु. ३०,७०, ७१५ /- (अक्षरी रुपये तीस लाख सत्तर हजार सातशे पंधरा फक्त) इतकी रक्कम मे. पीड्ब्ल्युसी कंपनीस अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर देयकांचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

Mumbai CCTV Project (April to June 2017)

#	Period & Invoice No.	Resource Name	Designation	Man Month Rate as per GR dated (01-July-2014)	Deployment (Percentage)	Applicable Amount per Resource (INR)	Total Applicable Amount	OPE Claimed	Sub Total (INR)	Service Tax @14 %	Swachh Bharat Cess @ 0.50%	Krishi Kalyan Cess @ 0.50%	Total Amount (INR)
A	B	C	D	E	F	G = E x F	H	I	J	K=STx J	L = SBC x J	M=K KC x J	N = J+K+L+M
1	1st April 2017 to 30th April 2017 (416122220)	Subhash Patil	Principal Consultant	2,75,000	50%	1,37,500	9,35,000	6,680	9,41,680	1,31,835	4,708	4,708	10,82,931
		Aditya Shrivastava	Principal Consultant	2,75,000	50%	1,37,500							
		Nikhil Pande	Senior Consultant	2,20,000	100%	2,20,000							
		Himanshu Goyal	Senior Consultant	2,20,000	100%	2,20,000							
		Sharang Gupta	Senior Consultant	2,20,000	100%	2,20,000							
2	1st May 2017 to 31st May 2017 (416122217)	Subhash Patil	Principal Consultant	2,75,000	50%	1,37,500	8,52,500	8,858	8,61,358	1,20,590	4,307	4,307	9,90,562
		Nikhil Pande	Principal Consultant	2,75,000	100%	2,75,000							
		Himanshu Goyal	Senior Consultant	2,20,000	100%	2,20,000							
		Sharang Gupta	Senior Consultant	2,20,000	100%	2,20,000							
3	1st June 2017 to 30th June 2017 (416122222)	Subhash Patil	Principal Consultant	2,75,000	50%	1,37,500	8,52,500	14,649	8,67,149	1,21,401	4,336	4,336	9,97,222
		Nikhil Pande	Principal Consultant	2,75,000	100%	2,75,000							
		Himanshu Goyal	Senior Consultant	2,20,000	100%	2,20,000							
		Sharang Gupta	Senior Consultant	2,20,000	100%	2,20,000							
Total							**26,40,000**	**30,187**	**26,70,187**	**3,73,826**	**13,351**	**13,351**	**30,70,715**

टीप:-

अ) उपरोक्त देयक या संदर्भात नमुद शासन निर्णय क्र. २ मध्ये नमुद केल्यानुसार सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागारांना दरमहिना दरमाणुस (Man-Month) तत्वानुसार अदा करण्यात येत आहे.

ब) शासन निर्णय संदर्भ क्र.२ नुसार सल्लागाराने कार्यालयीन कामासाठी केलेला प्रवास, भोजन, निवास, खर्च सल्लागारांना अनुज्ञेय राहील. हा खर्च सल्लागाराच्या महिन्याच्या देयकांच्या एकुण खर्चाच्या ५ % पर्यंत अनुज्ञेय केला आहे.

क) संदर्भ क्र. ६ अन्वये मे. पीड्ब्ल्युसी कंपनीने सादर केलेल्या देयकानुसार सदर रकमा अदा करण्यात येत आहेत. सदर रकमांमध्ये माहे एप्रिल, २०१७ ते जून, २०१७ या तीन महिन्याच्या कालावधीसाठी एकूण १५% कर (१४% सेवा कर +०.५ % स्वच्छ भारत कर+ ०.५ कृषी कल्याण कर) समाविष्ट करण्यात आला आहे.

ड) सीसीटीव्ही प्रकल्पासाठी संबधित कंपनीला सल्लागाराच्या मानधनापोटी जादा रक्कम अदा केली आली आहे असे निदर्शनास आल्यास सदर जादा रक्कम संबधित कंपनीकडून समायोजीत करण्याचा अधिकार शासनास राहील.

इ) सदर देयके आयकर व इतर प्रचलीत कर वजाती करून अदा करण्यात यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी येणारा खर्च पोलीस आयुक्त, मुंबई याच्या अधिनस्त असलेल्या “२०५५-पोलीस, (०२) (०१) शहर पोलीस आस्थापना, (दत्तमत) (२०५५ ००९७), ५०-इतर खर्च”या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून तो सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदरचा निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस आयुक्त, मुंबई यांना “नियंत्रक अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे. तर त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिका-याला “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.६८/अर्थ-३, दि.१.४.२०१७ ला अनुसरुन प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१५१७५५२२५७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a70 8cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2017.09.15 17:45:02 +05'30'

(कैलास गायकवाड)
उप सचिव, गृह विभाग

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
५. पोलीस आयुक्त, मुंबई

६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

८. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष,नवीन प्रशासकीय भवन,मंत्रालय, मुंबई.

९. कक्ष अधिकारी, व्यय-७/ वित्तीय सुधारणा-१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०.मे. पीडब्ल्युसी प्रा.लि., २५२, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई - ४०० ०२८.

११.निवड नस्ती / पोल-३

१२.अर्थ शाखा गृह विभाग.